# प्रभु तरुण

| वर्ष ५४ | अंक ९ | मुंबई | १६ मे, २०२१ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## गुढी उभारली

**—सुहासिनी कीर्तिकर**

‘प्रभुतरुणा’ने ‘मराठी गाण्यांची मैफल’ ऑनलाईन सादर करीत पाडवा साजरा केला. सौ. अनुष्का आणि श्री. अक्षय सुदीप कोठारे या तरुण जोडीने संयत आणि नेटके संवादसंचालन केले. औचित्य राखून ‘प्रभुप्रभात’ला त्याच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. संपादक या नात्याने मी या उपक्रमाला शुभेच्छा देताना उपक्रमाला दाद दिली. कारण माझ्यामते ही सानेगुरुजींची ‘धडपडणारी मुले’ आहेत. वसंत ऋतू बहावा, पळस, आंबा, गुलमोहोर, चाफा आदी फुलांची लालपिवळी उधळण करतो. तसे या उपक्रमाची विविध रम्य रंगांची प्रसन्न पखरण झाली - ही माझी भावना नंतरच्या कार्क्रमात सार्थच झाली. ‘प्रभुतरुणा’चे विश्वस्त श्री. बन्सी धुरंधर यांनी पाडव्याचे महत्त्व अधोरेखित करीत विश्वस्तांतर्फे शुभेच्छा दिल्या. खासियत म्हणजे मिलिंद प्रधान यांनी तयार केलेली पाडव्याची आरती सौ. मिहिका नवलकरने सादर केली. ‘आरती ओवाळू तुजला, चैत्र पाडव्याच्या गुढीला’ या आरतीमुळे मांगल्य निर्माण झाले. पाडव्याची गानगुढी उभारण्यात ज्यांचे हात लागले त्या सर्वांची दखल निवेदकांनी घेतली. अर्थातच त्यात मोनिका राणे, जान्हवी कीर्तिकर, मिहीका, मयुरा नायक, शिवानी आणि सागर देवरूखकर, ज्ञानदा आणि सुनील पवार होते; हे नव्याने सांगणे नको! त्यांना पाठबळ देणारे प्रभुतरुणाचे विश्वस्तही प्रेक्षकांना दर्शन देऊन गेले.

त्यानंतर रंगली ‘कानलाईन’ला सुख देणारी गाणी. अश्विनी कोठारे सूर्या (वारा वाही गाणे), संजय परब (दिवस तुझे हे फुलायचे), रोहन प्रधान (सूर तेच छेडिता), डॉ. सोनाली नागपुरे (प्रेमा, काय देऊ मी तुला?), दीपक विजयकर (देव देव्हाऱ्यात नाही), निरंजन कीर्तिकर (मानसीचा चित्रकार तो), सागर देवरूखकर (मल्हारवारी), अपर्णा विजयकर (ऐरणीच्या देवा तुला), विद्या राणे (येऊ कशी प्रिया), राजन (रात्रीस खेळ चाले), रॉनिका विजयकर (चांदणे शिंपीत जाशी), शिवानी देवरूखकर (जीव जडला) ... अशा मांदियाळीने सुखसागर तयार केला. सागरने ‘मल्हारवारी’ फेटा घालून आणि यथोचित सादरीकरण करून श्रोत्यांची मने जिंकली; तर शिवानीनेही सराईतपणे श्रोत्यांना ‘जीव जडला’ असे वाटायला लावले. कार्यक्रमाच्या शेवटी पुन्हा आयोजक तरुण मंडळी पडद्यावर आली. प्रभुतरुण ‘म्युझिक क्लब’ने होळी सणाला ‘रंग बरसे’ हे गाणे गायकाने स्वत:च्या घरून एकेक ओळ म्हणून अप्रतिम सादर केले होते. पाडव्याच्या या कार्यक्रमात शेवटी त्या गाण्याचीही झलक पाहायला मिळाली.

‘म्युझिक क्लब’ बरोबरीने ‘प्रभुतरुण थिएटर’ सुरू होत आहे. ‘स्टॅण्डप कॉमेडी’ कार्यक्रमाने त्याची सुरुवात होईल. ‘प्रभुतरुण’ मेहनतीने, चिकाटीने, एकजुटीने नवनवीन प्रकल्प, संकल्प करीत आहे. त्यासाठी झटणाऱ्या सर्व ‘तरुण’ मंडळीचे अभिनंदन. नववर्षारंभी उभारलेली कर्तृत्वाची, चैतन्याची, आनंदाची गुढी अशीच प्रेरणादायी आणि समाधानाची ठरो! मंगल कलश उपक्रमांचा कळस ठरो!

*

*विस्तारीत संपादकीय*

## महेश कोठारे-एक धडाकेबाज व्यक्तिमत्व!

**-संजना कोठारे**




‘महेश कोठारे! नाम तो सूना ही होगा!!!’ हे नाव केवळ महाराष्ट्रापुरते परिचित नाही तर देशभर प्रसिद्ध आहे. अतिशय अभिमानाची गोष्ट आहे की एक परभी नाव इतके प्रसिद्ध आणि लोकप्रिय झाले. त्यांचे असंख्य चाहते जगभर पसरले आहेत आणि त्यांच्या इतक्या वर्षाच्या कामगिरीबद्दल त्यांना सन्मानितही केले गेले आहे. ह्या सगळ्या बातम्या आपल्यापर्यंत पोहोचल्या आहेत कारण महेश कोठारे यांच्या असंख्य मुलाखती झाल्या आहेत आणि तशीच त्यांच्याबद्दल सर्व माहिती इंटरनेटवर उपलब्ध आहे.

आपल्या पाठारे प्रभू ज्ञातीतपण घरोघरी महेश कोठारेबद्दलची माहिती आहे, मग ती व्यावसायिक पातळीवर असो किंवा खाजगी. कुणाचा भाऊ तर कुणाचा मित्र, कुणाचा भाचा तर कुणाचा पुतण्या, कुणाचा मामा तर कुणाचा काका. त्यामुळे मी असे वेगळे काय सांगणार? तुम्हा सर्वांना सगळं माहीत असूनसुद्धा मी महेश कोठारेबद्दल असे वेगळे काय लिहिणार असे तुम्हाला वाटणे स्वाभाविक आहे.

महेश कोठारे पुन: एकदा चर्चेत आहेत कारण ‘द ब्लॅक लेडी’ पुन: एकदा त्यांच्याकडे आली आहे आणि त्यांना ह्या पुरस्काराने सन्मानित केले गेले आहे. १९८६ मध्ये महेश कोठारे यांना २ फिल्मफेअर्सचे अवॉर्डस मिळाले होते त्यांच्या ‘धूमधडाका’ चित्रपटासाठी, ‘सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक’ आणि ‘सर्वोत्कृष्ट चित्रपट’ आणि आता २०२१ मध्ये त्यांना सन्मानित केले आहे फॉर ‘Excellence in Cinema’.

‘बाल कलाकार’ म्हणून १९६४ मध्ये ‘छोटा जवान’ ह्या चित्रपटासाठी त्यांना ‘विशेष पारितोषिक’ दिले गेले होते. त्यांनी जेवढे चित्रपट बाल कलाकार म्हणून केले ते सर्वच सुपरहिट ठरले. त्यानंतर ‘प्रीत तुझी माझी’मधून अवघ्या विसाव्या वर्षात प्रथम नायकाच्या भूमिकेत ते दिसून आले. शिक्षण आणि वकिलीचा व्यवसाय सांभाळून त्यांनी नायक म्हणून बरेच चित्रपट केले आणि त्या दरम्यान एका चित्रपटात त्यांनी खलनायकाची भूमिकादेखील साकारली आणि त्या भूमिकेलादेखील त्यांनी अगदी योग्य न्याय दिला.

एक बाल कलाकार ते नायक, खलनायक अशा भूमिका साकारल्यावर त्यांनी झेप घेतली ‘धूमधडका’ ह्या चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन करून आणि त्यांतून सुरुवात झाली एका प्रगल्भ निर्माते आणि दिग्दर्शकाच्या भूमिकेची. धूमधडाकापासून त्यांनी मराठी चित्रपटांचा ट्रेंड बदलून टाकला आणि मराठी तरुणपिढीला चित्रपटगृहात यायला आकर्षित केले. महेश कोठारे यांचा ‘formula’ सुपरहिट ठरला आणि त्यापुढे त्यांनी असे बरेच विनोदी चित्रपट निर्मित आणि दिग्दर्शित केले जे भरघोस यशस्वी ठरले.

आपण जेव्हा महेश कोठारे यांच्या चित्रपटांकडे पाहतो तेव्हा एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते आणि ती म्हणजे महेश कोठारेनी मराठी सिनेसृष्टीला प्रत्येक वेळेस काहीतरी नवीन देण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्यांचा तो

(पान २ कॉलम १ वर)

विस्तारित संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

प्रयत्न यशस्वी ठरला आहे. त्यांनी मराठी सिनेमाला बऱ्याच नव्या गोष्टी दिल्या आहेत. त्यांचा 'धडाकेबाज' चित्रपट मराठी सिनेसृष्टीचा पहिला 'Cinemascope' चित्रपट आहे. ह्याच चित्रपटात त्यांनी 'special effects'चा देखील यशस्वीरित्या प्रयोग केला.

त्यानंतरही त्यांनी प्रत्येक चित्रपटात काहीतरी नाविन्य आणण्याचा प्रयत्न केला आहे आणि देवाच्या कृपेने तो प्रयत्न यशस्वी ठरला आहे. तसेच 'चिमणी पाखरे' ह्या त्यांच्या सिनेमात त्यांनी प्रथमच मराठी सिनेमात 'Dolby sound' आणला. त्यांच्या 'पछाडलेला' चित्रपटात महेश कोठारे यांनी प्रथमच 'Computer generated effects' आणले तर 'झपाटलेला-२' मध्ये त्यांनी 3D तंत्रज्ञानाचा उपयोग केला आणि मराठी सिनेमाला तिचा पहिला मराठी 3D चित्रपट दिला. त्यांचे हे सगळेच प्रयोग यशस्वी ठरलेले आहेत. केवळ सिनेसृष्टी नव्हे तर छोट्या पडद्यावरच्या त्यांच्या सर्वच मालिका यशस्वी ठरल्या आहेत.

महेश कोठारे यांचे मराठी सिनेसृष्टीतले योगदान आणि विक्रम इतिहासात जमा झाले आहेत जेणेकरून आपल्यालाच नाही पण आपल्या पुढच्या पिढीलादेखील एका पाठारे प्रभूचे मराठी सिनेसृष्टीतले योगदान पाहून अभिमान वाटेल. ह्या योगदानामुळे त्यांना हे बहुमूल्य पारितोषिक फॉर "Excellence in Cinema' बहाल करणे स्वाभाविकच आहे आणि त्यासाठी मलाच नाही तर आपल्या संपूर्ण ज्ञातीला त्यांचा अभिमान असायला पाहिजे.

ही झाली ह्या वर्षाची ताजी बातमी जी मी एका सहसंपादिकेच्या भूमिकेतून साकार केली. परंतु काही गोष्टी आहेत ज्या मी एक पत्रकार म्हणून नव्हे तर महेश कोठारेंची 'फॅन' म्हणून निभावू शकेन असे मला वाटते कारण एका कलाकाराला योग्य मान आणि प्रेम केवळ त्याचा चाहता म्हणजेच त्याचा 'फॅन' देऊ शकतो. आम्ही एकाच 'तळपदे' कुटुंबाचा भाग असल्यामुळे अर्थातच आमच्या घरी महेशमामाबद्दल चर्चा व्हायच्या आणि लहानपणापासूनच मी 'आपल्या' सुपरस्टारची 'फॅन' झाले.

शाळेत असतानाच मला कळले की महेश कोठारे हे नाव किती प्रसिद्ध आहे. तेव्हा धूमधडका चर्चेत होता आणि त्यावेळेस मराठी चित्रपट जरी असला तरी माझ्या अमराठी मैत्रिणींनी धूमधडाका पाहिलेला आणि महेश कोठारे हे नाव माझ्या मैत्रिणींमध्येसुद्धा परिचित होते आणि त्यांचे सर्वच चित्रपट लोक आवडीने पहायला जायचे ह्याचा मला लहानपणापासूनच अभिमान होता. मी आजपर्यंत केवळ तीन 'फॅनमेल' पाठवले आहेत आणि माझे पहिले 'फॅनमेल' माझ्या वयाच्या १२व्या वर्षी मी महेशमामाला पाठवलेले त्यांची 'Khaitan' Fan म्हणून.

माझ्या मैत्रिणींचा महेश कोठारे-बद्दलचा आदर पाहून मला एक गोष्ट लक्षात आली की, जितका सन्मान परकी माणसं देतात तितकी आपली माणसं देत नाहीत. कारण एखादी व्यक्ती यशस्वी व्हायला लागली की त्या व्यक्तीबद्दल प्रशंसा सोडा, निंदा जास्त ऐकण्यात येतात आणि आश्चर्य म्हणजे मराठी माणसंच मराठी माणसांची निंदा करायला पुढे असतात.

'निंदकाचे घर असावे शेजारी', असे म्हणतात खरे; परंतु कायम जेव्हा केवळ निंदाच करतात तेव्हा लक्षात येतं की लोकांना केवळ टीका करता येते. प्रशंसा करायला मोठे मन लागते जी फारच दुर्लभ गोष्ट आहे. कधीतरी शंका येते की हा दोष केवळ आपल्या मराठी माणसातच आहे की काय. कवी चंद्रशेखर गोखले यांनी किती योग्य म्हटलंय, 'चढाओढ या शब्दाचा अर्थ आपण किती उलट लावतो, कोणी वर चढताना दिसला, की लगेच खाली ओढायला धावतो.'

मला अजूनही कळत नाही की, 'आपलं' समजून कोणी का साथ देत नाही? टीका करणाऱ्यांनी एवढा तरी विचार करावा की आपण तेवढे तरी करू शकतो का जे त्या व्यक्तीने केले आहे? एक 'फॅन' म्हणून मला ह्या गोष्टींचा प्रचंड राग येतोच परंतु जास्त राग ह्या गोष्टीचा येतो की 'आपल्या' माणसांबद्दल कोणी टीका का करावी? प्रोत्साहनाची पहिली थाप जेव्हा आपल्या माणसांकडून येते तेव्हा स्वत:वरचा विश्वास अजूनही भक्कम होतो. एखादी व्यक्ती त्याच्या बळावर पुढे येते, प्रचंड परिश्रम घेऊन बरेच पडाव पार करून आपले नाव कमावते. परंतु त्या परिश्रमाला नजरेआड करून लोकांना केवळ टीका करण्यात स्वारस्य असते ही फारच लज्जास्पद गोष्ट आहे.

महेश कोठारे यांची हल्लीच झालेली एक मुलाखत मी 'यूट्यूब'वर पाहिली आणि ती पाहून त्यांच्याविषयी अभिमान द्विगुणित झाला. मी महेश कोठारे यांना एका वेगळ्या दृष्टीने पाहिले. एक अतिशाय 'Down to Earth' व्यक्तिमत्व समोर आले जे मला खरोखर अपेक्षित नव्हते. आपली 'Success story' सगळेच सांगतात परंतु आपले अपयश 'social media' वर जाहीर स्वीकारणे फार कमी. आपल्यातही काही दुर्बलता आहे हे मान्य करणारे महेश कोठारे दिसले परंतु आपल्या सामर्थ्याला जोपासून पुढे जाऊन सर्व अडथळ्यांवर मात करून जिंकणारे महेश कोठारेही दिसले आणि त्याचक्षणी ते, 'धडाकेबाज' ठरले. ह्या माणसात मी साहस पाहिले, जगाशी भिडण्याची ताकद पाहिली आणि जी गोष्ट मला सर्वात आकर्षित करते, ती म्हणजे त्यांचा 'प्रामाणिकपणा' दिसला. एका 'pheonix' पक्ष्यासारखी त्यांची भरारी पाहिली. ज्या साहसाने त्यांनी सर्व अडथळ्यांना पार केले आणि आज हा मुक्काम गाठला, त्याबद्दल अभिमान वाटला.

महेश कोठारे यांनी मराठी सिनेसृष्टीला जे योगदान दिले आहे ते अमूल्य आहेच आणि जोपर्यंत मराठी सिनेसृष्टी आहे तोपर्यंत तरी त्यांचे नाव अमर आहे. महेश कोठारे आम्हाला तुमचा प्रचंड अभिमान आहे. तुमचे मनापासून अभिनंदन. तुम्हाला तुमच्या पुढच्या वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा आणि तुमच्या 'फॅन्स'ची संख्या वाढत जावो हीच सदिच्छा. परंतु तुमचा 'Khaitan Fan' कायम एकच हां...' संजना ऊर्फ मिनोती कोठारे!!! नाम तो सुना होगा???

✳

# My Tryst with Magnificence

**- Mayura Nayak**

(Cont. from April issue)

5. Music indeed plays a very important role in creating dance. Which musicians have you enjoyed partnering with?

I was very lucky that here in Ahmedabad I met a musician called Atul Desai. He was a classical musician and vocalist. I had a chance to work with some wonderful great musicians. But Atul got very interested in my work and started composing especially for my dance. I would like to say that deep within him, he was actually a dancer himself. He didn't dance but from within he could feel the movement and compose accordingly. We worked together for 40 years and he composed all my music until he passed away. After him I worked with many musicians but I really miss him even today.

6. It is on record that you choreographed for the film Umrao Jaan in 1981. Are there any other films that also showcase your work?

Yes, I did "Sursargam" for K Vishwanath and also for Muzaffar recently which was called "Jaan Nisaar" I will tell you how I got into films. Muzaffar Ali was doing Umrao Jaan and he already had Gopi Kishen for his choreography. Now Gopi Kishen was a known name in the industry but nobody knew me in the film industry. There is one song by Gopi Kishen in it, but the producers financing the film wanted the choreography to be more periodic in the times of Umrao Jaan. They wanted more authentic and less bollywoodish dances. Muzaffar is a friend and our families have known each other for a long time. He approached me to do the film and literally dragged me but I didn't have a film background so I was skeptical still on his insistence, I did it. Rekha was a wonder to work with, very cooperative and graceful. After seeing my work, K Vishwanath called me for his film which was 'Sursargam' with Jayaprada.

7. How was your experience working with Birju Maharaj?

I worked a lot with him as his partner for many years. I was the student of his uncle Shambhu Maharaj. Birju Maharaj is 7 years younger to me. In Bhartiya Kala Kendra they used to pair us together. He would play the male protagonist and I would be his female lead. We did "Malti-Madhav", "Kumarsambhav" "Shaan E Awadh" and a lot more performances together. We spent a lot of time with each other, we danced, talked, laughed, ate and travelled together for many years and we were good friends. But our ideas were very different. He came from a different background and a very traditional thinker.

**8. Do you think Indian Cinema has contributed in giving classical dance an audience? If you had to mention a few names from the Indian Cinema who have truly represented Classical dance in its purity who would they be and which of their dances do you instantly recall?**

There have been wonderful dancers in Cinema like Vaijayanti Mala, she even today did a solo performance on stage at this age so beautifully. But in cinema you have to do what the dance teacher teaches you. And dance choreographers in films do not know much about classical dance, they miss the ethos. They think the audience likes it, they have created their own form which is Bollywood dance. But there was one beautiful dancer in Bollywood, Helen…she was not a classical dancer, but a beautiful dancer! I used to like her a lot. Even recently when my dance group performed recently at the Opera House theatre, Helen, Waheeda Rehman and Shabana Azmi came for my show. Waheeda Rehman, Helen and Vaijayanti Mala are some of the beautiful dancers who always mesmerized me.

9. One can learn any form of dance, but one cannot learn to become a choreographer of dance. Can choreography be taught? Does your dance institute touch upon that aspect while training dancers?

Choreography can be taught and in western countries there are schools for choreography. They take exams but in India it is not taught like that and even I have not learnt it like that. I didn't know ABC of choreography, there were

(cont. on page 5 col. 1)

From the heart

## *PARIMALA BHAT, A Woman with a great Vision*

**-Anarkali Sandip Velkar**

***"Optimism is the faith that leads to achievement. Nothing can be done without hope and confidence." Quotes Helen Keller,*** a visually impaired American author, disability rights advocate, political activist and lecturer.

This is so true of Parimala Bhat whom we refer to as Paritai. Born visually impaired to sighted parents, she encountered many challenges a blind person would face, right from her childhood. But she stood strong and overcame these challenges and had made her decision at a very young age to help other visually impaired people, especially the young to enable them to compete with the main streamline.

During her school education, the most difficult task was to get a Reader or Scribe(writer) to write exams, books weren't available in Braille after Std X or XII. So pursuing graduation or any other professional course wasn't easy. But her perseverance took her to a different level. She completed her B.A.& MSW both with Honors, and Diploma in Business Management from Khandelwal Institute, Mumbai. She retired from Air-India as Senior Manager, Medical Service Department in August 2015 after having worked for 35 years. What was amazing about her journey is she travelled by train as you and me would, even during peak hours and still does.

She has been the first blind Indian lady to present a report on the situation of Blind Women in India at a Leadership Training Seminar at Malaysia in 1981. In 1994 she participated in Himalayan expedition to KshitiDhar Peak in Manali, scaling 17,500 ft. She has been the recipients of many prestigious awards for her work. In 1986 received from "All India Confederation of the Blind" for Outstanding achievements at the hands of the then Vice-President of India Shri Shankar Dayal Sharma, the prestigious "Hirkani Award" from Doordarshan in 2011, "Nav Durga" Award from Loksatta in October 2017, just to name a few. She was also felicitated by the Brahman Sabha at the Sahitya Sangh, Girgaum, for her outstanding contribution in the field of Social Work and has been interviewed by various TV Channels for her good work.

She founded Snehankit Helpline, a registered NGO on 21st August 2001, which empowers the visually impaired youth especially the students, by providing a variety of services to assist them in their education, all round development, helping them lead successful careers and lives. Snehankit Helpline commenced its activities in Mumbai with the Audio Books Project (Digital recording of educational material), which continues to be one of the major activities of the organization along with other projects.

Various projects of the Helpline have been a great boon to students all over Maharashtra and the neighbouring states. What is noteworthy is the large database of dedicated and selfless volunteers from all walks of life, who work tirelessly to fulfil the vision of Snehankit Helpline. Every project of the Helpline aims at making access to study material simpler for the visually impaired.

**1. Digital Books** – Volunteers record various subject books, right from school to professional courses or general reading in English, Hindi, Marathi, Gujarati and Sanskrit and these books are converted into CDs or given on pen drives

**2.** Providing readers and scribes

**3.** Organising informative programmes in personality development, voice culture, English conversation, Computer education, Android and Smart phone training

**4.** Conducting workshops for job recruitment, financial management, effective communication etc.

**5.** Braille-Me, a device that enables the visually challenged to get instant mobile connectivity and access to books at their fingertips, is provided by the Helpline at a much reasonable cost.

**6.** Printing books in Braille

**7.** Training Volunteers to read and write Braille

My association with Snehankit and Paritai goes back to 2014 when I started volunteering with them. I was awestruck at the speed at which she works, her mind is constantly striving towards bettering the existing services and coming up with new ways to empower the blind. Very techno savvy herself, she wants every visually impaired to become friends with technology. The satisfaction that you get working for Paritai and Snehankit Helpline is immeasurable. I feel honoured to be associated with Snehankit Helpline as a member of the Managing Committee and would like to be a part of Snehankit's future endeavors.

(Cont. on 5 col.3)

# शिक्षकाचा ज्ञानमार्गी अनुभव...

**- गीता आंबवणे**

मी शाळेत आले.
झाडे वेली फुले
सुहास्य प्रसन्न वदनांनी म्हणाली,
सुस्वागतम्
ज्ञानदेवांच्या चालीने
चाल मी चालले
तू माझी, तुझी मी झाले.

३६ वर्षे एईएसमध्ये सेवा करून मी निवृत्त झाले, पण शिकणे आणि शिकवण्याचा ध्यास घेतलेल्या मला आणखी नवीन क्षितीजे खुणावू लागली. मा. दादासाहेब दांडेकर मराठी माध्यम शाळा, भिवंडी शिशुविहार शिक्षण संस्थेची ही शाळा बालवाडी, प्राथमिक आणि माध्यमिक असे बालवर्ग ते इयत्ता १०वीपर्यंतचे वर्ग चालविते. या शाळेत उपाध्यक्षा म्हणून कार्यरत झाले. तत्पूर्वीही शाळेत आठवीचा वर्ग नवीन सुरू झाला तेव्हा इंग्रजी विषय ह्या मुलांना शिकवला होता. शाळेत येणाऱ्या मुलांचा, त्यांच्या घरच्या परिस्थितीचा, पाल्कांचाही परिचय झाला होता. कामगार वस्तीतील, पोलीस कॉलनीतील, सर्व थरातील विद्यार्थ्यांचा त्यात समावेश होता.

शालेय व्यवस्थापन बघतानाच शाळेचा शैक्षणिक दर्जा कसा उंचावता येईल याकडेही लक्ष असायचं.

सन २०१७ - १८.

शाळेच्या मुख्याध्यापकांनी दहावीच्या विद्यार्थ्यांविषयी विचारपूस केली असता सरांनी स्पष्ट मत मांडले, ''आपल्याला मुलांना आठवीपर्यंत नापास करता येत नाही. यावर्षीची बॅच अभ्यासात फारच कच्ची आहे. आपल्याला एसएससीच्या निकालाची काळजीच आहे. आम्ही प्रयत्न करणारच आहोत पण शक्यता फारच कमी वाटत आहे.''

माझं मन सातत्याने विद्यार्थांच्या भवितव्याचा विचार करू लागलं. मला स्वस्थ बसवेना. आपण काहीतरी केलेच पाहिजे. माझ्यातला शिक्षक पुन्हा पुन्हा विद्यार्थ्यांना विसरू देत नव्हता. आणि माझ्या मनाने ठाम निश्चय केला. या मुलांचे हे दहावीचे वर्ष मी वाया जाऊ देणार नाही.

मुख्याध्यापकांना दहावीच्या तीनही तुकड्यांतून अप्रगत विद्यार्थांची यादी देण्यास सांगितले. त्याप्रमाणे सरांनी एकूण ३५ मुलांची नावे मला दिली आणि सांगितले, ''मॅडम, ही मुले ह्या वर्षी अजिबात पास होऊ शकणार नाहीत. यांच्यामुळे आपली दहावी निकालाची टक्केवारी एकदम घसरणार आहे.''

त्यांचे म्हणणे मी ऐकून घेतले आणि शेवटी या वर्षासाठी ही ३५ मुले तुम्ही तुमच्या वर्गामध्ये न बसवता माझ्याकडे सोपवा असे सांगितले.

काय गंमत असते बघा. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले आणि पहिल्याच दिवशी या मुलांची मी मीटिंग घेतली. मीटिंग घेण्याचे कारण मुलांना विचारले. मुलं म्हणाली, ''आम्ही अप्रगत आहोत.''

मी मुलांना म्हटलं, ''अजिबात नाही. यावर्षी तुम्हाला किती टक्के मार्क्स मिळतील असे वाटते?''

ह्या प्रश्नाचे उत्तर मुलांनी कोणी ८५%, ७७%, ६५%, ६०% असेच दिले. तेव्हा मी त्यांना म्हटले, ''बाळांनो कोणत्या अर्थानी तुम्ही स्वतःला अप्रगत म्हणता? ह्या क्षणापासून विसरून जा तो शब्द. आपल्याला चमत्कार घडवायचा आहे, इतिहास घडवायचा आहे. तुमची मला मदत हवी आहे. हातात हात घेऊन आपण एकमेकांचे मित्र होऊया आणि आपल्या अभियानाला आरंभ करू या.''

१) प्रत्येक मुलाची स्वतंत्र फाईल तयार केली.

२) अभ्यासाचे वेळापत्रक तयार केले.

३) जरुरीप्रमाणे विषयाचे वर्गीकरण केले.

४) स्वतंत्र वर्गात आमचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले.

दररोज वर्गात केलेला अभ्यास प्रत्येकाच्या फाईलमध्ये जमा होत होता. मुलांशी केलेली मैत्री आणि निर्माण होत असलेला त्यांच्यातील आत्मविश्वास त्यांना योग्य दिशेने नेत होता.

सर्व मुलांच्या घरची आर्थिक परिस्थिती, घरातील वातावरण, घर ते शाळा यात उदभवणाऱ्या समस्या, पालकांशी संवाद यातून मुलांच्या अभ्यासाविषयक अडचणी समजून घेतल्या.

मुलांची कुवत लक्षात घेऊन आणि काहीही झाले तरी त्यांचे दहावीचे वर्ष वाया जाणार नाही यासाठी मी स्वतः या मुलांची आई झाले, मैत्रीण झाले, मार्गदर्शक झाले. मुलांच्या सवयी, स्वभाव, शारीरिक आणि बौद्धिक कुवत यांचा नीट विचार केला आणि ठरविल्याप्रमाणे सर्व विषयांचे मार्गदर्शन व मुलांबरोबर अभ्यास करायला मी सुरुवात केली.

दररोज १२:३० ते ५:३० आमचा वर्ग भरत असे. प्रार्थना झाल्यावर ओंकार आणि ध्यान होत असे. याचा परिणाम मुलांना अभ्यासात रुची वाढत आहे आणि स्मरणशक्ती वाढत आहे असे लक्षात आले. वर्गात मुलांनीच सूत्रे, समीकरणे, व्याख्या, व्याकरण नियम, प्रयोग, प्रमेय यांचे तक्ते करून लावले. त्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. त्यांच्या प्रत्येक कामात त्यांनीच लक्ष दिल्यामुळे नीटनेटकेपणा येवू लागला होता. प्रश्नपत्रिकेतील प्रश्नाचे स्वरूप स्पष्ट करून सांगितले. कोणते प्रश्न आधी सोडवाचे, उत्तरे कशाप्रकारे लिहायची याचा सराव केला. त्याचा

(पान ४ कॉलम ३ वर)

## मनातले काही...

-आरती जयेश कोठारे

### हरवलेले स्वप्न

हरवलेले स्वप्न माझ्या अंगणी वसु दे
अंतरीचा बोल हा मज भान हरपून ऐकू दे

माझे मन मजलाच शोधत दूर देशी जाऊ दे
परतताना हेच मन मग शुद्ध होऊन येऊ दे
अंतरीचे स्वप्न माझ्या भावनात मग रंगू दे
रंगल्यावर तेच स्वप्न जगण्यात रंग भरु दे

अंगणीच्या फुलांवर मज तेच रंग दिसू दे
बहरलेल्या फुलांसम हे मन माझे बहरू दे
गंध त्यांचा अंगणी अन् अंतरात राहू दे
अंतरीचा गंध मग जगण्यात ह्या मिसळू दे

हरवलेले स्वप्न माझ्या अंतरी मज गवसू दे
अंतरीच्या स्वप्नात ह्या मग भान माझे हरपु दे
हरवलेल्या जीवनास ह्या नवी वाट मिळू दे
स्वप्न माझे जीवनात ह्या सत्य होऊन येऊ दे

*

### एक पाखरू इवलं इवलं

एक पाखरू इवलं इवलं
चिमुकल्या डोळ्यांचं
चिमुकल्या पंखांचं
डोकं वर काढून बघतंय
घरट्याबाहेर काय दिसतंय...

एक प्रचंड मैदान मोठ्ठं
थोडं निळं थोडं पांढरं
मध्यभागी पिवळा चेंडू
अवतीभवती खेळती पाखरं

एक खोपा सुगरणीचा
उलटाच कसा लटकलेला
एक गरुड आसमंती
उंचच भराऱ्या घेणारा

शेजारची एक खारुताई
इकडे जाई तिकडे जाई
ढोलीतल्या पिल्लांना तिच्या
थोडा थोडा खाऊ देई

खाली दाट हिरवळ कशी
त्यातून वाहे एक नदी
खळखळ खळखळ जात आहे
कधी कुठे थांबत नाही

एक पाखरू इवलं इवलं
चिमुकल्या डोळ्यांचं
चिमुकल्या पंखांचं
जंगलापलीकडे डोकावायला
भुर्रकन उडायला आसुसलेलं

एक पाखरू इवलं इवलं ...

## TRIBUTE TO RASIK KAKA!!!!
## REST IN PEACE FOREVER AND EVER..

Kaka (RASIK KRISHNARAO VIJAYAKAR), I still can't believe I am writing a tribute because of your passing away. Words cannot describe this difficult moment, but if this is the last time I get to say goodbye then I know I will do so with the knowledge that I consider myself blessed to have lived this life as your nephew.

You touched so many lives by your selfless and countless acts of kindness, always giving and never expecting any favours in return. Your dedication to a cause was what set you apart. For every institution you worked for, you laid the path for others to succeed.

The benefits of your hard work is a living testimony for so many young men and women you took under your wings at a personal and professional level.

I would like to share a small incidence of the amount of dedication my Kaka had in doing smallest of things. I still remember our picnic to Nainital in the year 2001. We both went to Saloon and for the first time you said that you want to keep a French Beard. I was little sceptical about the same but you were so stubborn on your decision about wanting to keep the same. I remember telling you think twice Kaka before keeping the same & against my area of concern you kept the same & till date you maintained it for 20 long years with same enthusiasm with which you had kept the same for the first time. If you had such an amazing dedication in maintaining your beard imagine the amount of dedication my Kaka would have had with regards to pursuing other activities.

Kaka, you were and will always be an inspiration to myself, the entire family and anyone who worked with you. You have left a void in the family that will never be filled.

While we mourn today, we also take comfort in the fact that your mission on earth have been fulfilled. We thank the Lord for your life and bid you farewell and REST IN PEACE FOREVER AND EVER...

Your Nephew
**Sanket Deepak Dhairyawan**

## कामगारांची वाली कु. सुंदर नवलकर

कु. सुंदर नवलकर ही दादरच्या सुप्रसिद्ध वकील व सामाजिक कार्यकर्ते विनायक रामराव नवलकर ह्यांची कन्या. नागपूर विद्यापीठातून बी.ए. केल्यावर तिने मुंबई विद्यापीठातून एलएलबी करून वडिलांप्रमाणे वकिली करण्याचे ठरविले. थोडे दिवस वडिलांबरोबर पोयबावडीच्या त्यांच्या ऑफिसात तिने कामही सुरू केले. एलएलबी करीत असताना वडिलांवर पैशाचा बोज होऊ न देता दादरच्या आयडीयल स्कूलमध्ये शिक्षिकेची नोकरीसुद्धा केली. स्त्री शिक्षणास फारसे महत्त्व नसण्याच्या काळात पांढरी नऊवारी सुती साडी नेसून सायकलवरून शाळेत शिकवायला जाणारी सुंदर ही एक कौतुकाचा विषय होती. वडिलांचे तिला आग्रहाचे सांगणे होते की, तिने क्रिमीनल लॉ करावा आणि त्यात तिने नाव कमवावे. लहानपणीच आईचे छत्र हरवलेल्या सुंदरचा स्वभाव थोडासा हेकट आणि विचारशैली स्वतंत्र असल्यामुळे लवकरच तिने वडिलांसोबत बसणे सोडून फोर्ट येथे स्वत:चे ऑफीस थाटले व ट्रेड युनियनच्या कार्याला वाहून घेतले. वडील हिंदूमहासभावादी होते तर मुलीने चक्क माओवाद स्वीकारला. महाराष्ट्रातील पहिले कम्युनिस्ट (मा.ले.) युनिट तिथेच स्थापन केले. नक्षलवादी असल्यामुळे सरकारने कॉमरेड सुंदर नवलकरला तीनचारवेळा तुरुंगातही टाकले. युनायटेड लेबर युनियनतर्फे तिने कॉन्ट्रॅक्ट वर्कर्स, कन्स्ट्रक्शन वर्कर्स, दलित सफाई कामगार ह्यांच्या केसेस यशस्वीरित्या हाताळल्या. एअर इंडियाविरुद्ध युनायटेड लेबर युनियनने १९९६ मध्ये सर्वोच्च न्यायालयात विजय मिळविण्याचे ऐतिहासिक काम केले. आणीबाणीत इंदिरा गांधी सरकारने तिला तुरुंगाची हवा दाखविली. बराच काळ भूमिगत असताना जेव्हा तिला अटक झाली तेव्हा Brain behind Naxalite movement in Maharashtra Sunder Navalkar is arrested ही बातमी टाइम्स ऑफ इंडियासारख्या नामवंत वृत्तपत्राने अगदी पहिल्या पानावर छापली होती. येरवड्याच्या तुरुंगात तिच्या सोबतीला होत्या अहिल्या रांगणेकर, मृणाल गोरे, प्रमिला दंडवते इत्यादी कर्तृत्ववान महिला.

सुंदर नवलकरने अगदी जीवनाच्या अखेरीपर्यंत वर्कर्सची सेवा केली. दर १५ दिवसांनी प्रसिद्ध होणारे जासूद हे पत्र त्याचा ठणठणीत पुरावा आहे. साधी राहणी आणि उच्च विचार हा तिचा मोटो होता. साधी सफेद सुती साडी हा तिचा ट्रेड मार्क होता.

गरीबांचे हित सतत पाहणाऱ्या ह्या जगावेगळ्या कर्तृत्ववान महिलेला सलाम ठोकून तिला श्रद्धांजली वाहूया. ओम शांती.

**-सुरेश मनोहर नवलकर**

(पान ३ कॉलम ४ वरून)

परिणाम प्रथम चाचणीत दिसून आला. मुलांना अभ्यासात अधिक रस वाटू लागला. त्यांनी केलेला अभ्यास रोज तपासला जात होता. शंका निरसन केल्या जात होत्या. प्रत्येकाकडे वैयक्तिक लक्ष दिले जात होते. मुले एकमेकांना अभ्यासात मदत करू लागली.

त्यांना शिकणे व शिकवणे आवडू लागले. मुलांनी चिकाटीने, सातत्याने केलेला प्रयत्न, जिद्द आणि त्यांच्यात निर्माण झालेला आत्मविश्वास यामुळे ३५ विध्यार्थांचा विशेष वर्ग लक्षणीय ठरला. जसजशी वार्षिक परीक्षा जवळ येऊ लागली, मुले झपाटल्यासारखे सराव करत होती. शाळेत वेळेच्या आधी येऊन वेळ संपल्यावरही वर्गातून न जाता स्वत:ची अभ्यासाची फाईल काळजीपूर्वक कपाटात जमा करत. ठरवून दिलेला अभ्यास ठराविक वेळेत झालाच पाहिजे हा निश्चय त्यांच्या प्रयत्नातून स्पष्ट दिसत होता. वार्षिक परीक्षा पार पडली.

बोर्डाची परीक्षा, त्यामुळे निकालाचे दडपण साहजिक होतेच. आणि अखेर तो दिवस उजाडला.

निकाल समोर आला. या विशेष वर्गाने विशेष कामगिरी फत्ते केली होती. या वर्गाचा निकाल १००% लागून सर्वच्या सर्व मुले चांगल्या गुणांनी यशस्वी झाली. अलौकिक यशाची मानकरी ठरली. शाळेत नवा इतिहास घडवणारी ठरली. सर्वांना स्फूर्तिदायक ठरली.

विद्यार्थ्यांचे अथक प्रयत्न, गुरुजनांचे आशीर्वाद, आणि माता सरस्वती कृपा यामुळेच संपूर्ण शाळा आनंदात न्हाऊन निघाली. अशी आहे ही आमच्या सुपर पस्तीसची यशोगाथा.

एनईएसमधील अनुभव, मा. सौ. आंबवणे मॅडम ह्यांचे प्रोत्साहन, ज्या शाळेत हा प्रयोग केला तेथील मुख्याध्यापक श्री. दीपक लेले व दहावीचा शिक्षकवर्ग ह्यांचेही मोलाचे योगदान ह्या यशाच्या कथेमागे मागे आहे.

मी सध्या लायन्स क्लब ऑफ भिवंडीची अध्यक्ष आहे. ही यशकथा एक उदात्त समाजकार्य म्हणून इंटर्नॅशनल क्लबकडेही आम्ही पाठविली आहे. आज हा अनुभव आपल्यासमोर मांडताना विशेष आनंद होत आहे.

**-लायन सौ. शीतल सुधीर देशमुख**
President
Lions Club of Bhiwandi
Mobile No. 9284236623

*

(Cont. from 2 col. 4)

not books at that time, but I learnt it from my own experiences, imagination and I taught this to myself. I learnt choreography by taking inspiration from architecture. I would go to NID (National Institute of Design) and look at all their magazines of their great art, designers, furniture designs, and architectures. I used to ask questions to these architects to know why a certain window was placed in that position. I learnt a lot looking at these creations, by seeing art books and paintings and also listening to poetry. That is how I learnt choreography.

10. What advice would you give aspiring composers? How can a composer better his or her art at composition? Watching others compose can be limiting. How does one train to become a composer?

Everyone should work in their own space. They need to have their own imagination, esthetics, vision, passion and ambition to create something of their own. These are things which money can't buy. Choreography needs a different passion for the art. Today's youngsters have stopped reading. They need to know more, they listen to this Bollywood music, but they do not listen to good music. They need to look at art of various kinds to inspire them and create something that is original.

11. One unaccomplished dream that you would want your students to achieve for the future of the dance form you have worshipped all your life would be?

I created this institute Kadamb School of dance on my own. I didn't come from a rich family and nor did the government support me. The corporate did not support me, so every penny that I earned from my programs, my many programs that I performed in many countries, I collected all that money and built this school. I want my students to continue running this school and with the same kind of atmosphere that is there now and I would like my students to continue my work and continue choreographing. Some of my students are already doing a wonderful job, some of them are doing their MS in Dance at Gujarat university and also pursuing to do Doctorate in Dance. One of them sketches beautifully so I ask them to take inspiration from their other forms of art as well.

12. Which other classical dance form in India delights you?

I like Bharat Natyam and Odissi as dance forms. I learnt Bharat Natyam from Ram Gopal. What I learnt through this form was perfection of line. He would stand behind and correct me which is not taught in Kathak. Kathak has an easy flow of hands while Bharat Natyam demands that perfection of form. I got the benefit of both from the two dance forms

13. In your career spanning 70+ years you have worked with so many dancers belonging to other faculties of dance, which other faculty of dance blends beautifully with Kathak according to you? It could be Indian or western as well.

I don't adapt any other style when I Choreograph kathak, I keep the art in its pure form but I do re-design it. Nowadays kathak dancers focus on chakkar, but I don't think that is what kathak is all about. Kathak is not about showing physical capabilities of doing 100 or 150 chakkars, it is a beautiful dance form which can be enhanced with beautiful costumes. I focus on production, lighting and my dancer's costumes. I designed and re-worked on my dancers presentation, so the dancers are comfortable not loaded with jewelery, they are dancers not brides, the costumes should be made with material that can be easily washed so they can be re-used.

14. Indian Folk dance forms also go back many years whether it is Marathi Lavni or Nautanki from Central India, Ghoomar from Rajasthan, etc. have you adapted these art forms in your composition?

Folk dances of India are beautiful, but in their authentic form. Now they take folk dances to these festivals but they are not able to keep it authentic.

15. What are your fondest memories from your childhood that connect you to our Community of Pathare Prabhus?

Food Food and Food. My favourite food is 'Bhujane'. Then I remember all the delicacies of 'Shraavani Somvaar' and 'Shraavani Shanivaar'. Morning we ate faraal, evening we would have 'Vade', 'umbar', 'paatvad' I remember those as fond memories and really miss that. Then our 'sambaare' and 'kharavni', 'tomatochi sheer', our 'chutney che sarange', my family likes tomatochi sheer and bhujane, I like Khadkhadla too but my family doesn't eat a lot of spice. I still call for our PP masalas. I remember my home in Khar on 6th Road. Later we shifted to 16th road. I was in Mumbai till I was 9 years old. We were a joint family then, but later we shifted to an apartment on the 16th Road near the Khar gymkhana. I went to Nimkar school, and later to New Khar school, which has now changed a lot. Over all Khar has changed a lot so I can't recognize much of it now, but old Khar is engraved in my childhood memories.

Alas, after a good two hours of meeting with her, I had to take her leave. A pleasant evening well spent had to end, with a hope to meet again. As she spoke about one of her performances she called "Atahkim" which means, "Where do I go from here?" A similar feeling sank into me, after meeting her, where will I find such excellence, an artist of her stature from whom there is a lot to learn, I left her house thinking, of all possibilities of keeping my association grow stronger with her. Just a few hours in her company, taught me so much about this art and about how a life can be lived unabashed, free and so buoyant. An open mind that is willing to embrace a traditional art and recreate magic with fresh ideas is nothing less than magnificence and such was my tryst with this magnificence called Padmabhushan Smt. Kumudini Lakhia Jayakar.

During my Ahmedabad stay, I also got a chance to visit her Kadamb School of Dance and meet her students, some who have been with her for the past 40 years. She lovingly gifted one of her books titled 'Aavartan' to me and I also grabbed this opportunity to interview her students. I was taken on a beautiful tour of her dance school by her enthusiastic students. Due to lack of space, these videos and images of the school and our meeting cannot be published in our newsprint copy but will be soon published in our website. We will try to share some beautiful excerpts from her book and also show her accomplishments in detail on our website. We hope this meeting is a start to a beautiful association with this living legend who's presence many of us were unaware of. I have promised her some PP delicacies in my next visit to meet her, so I will continue to rekindle her association with our community in as many ways possible.

---

My Dear brother Jyotindra passed away on 13th April 2021after suffering for a month in hospital which he bore it patiently.

He leaves behind his wife and son.

We three brothers grew together my elder brother late Vilas and now Jyotindra fondly called Jyoti or Joe.

He was very fond of body building and he was an Physical Instructor at Talwalkars for many years.

He was working for BOI Museum Branch and he retired in Bandra Branch.

Because of his good physic he was nicknamed Sony Liston at Museum Branch.

He loved cricket very much.

He was a Captain of BOI B Team.

We used to play gully cricket and and most of the times we used to win because of his all round performance.

He was all rounder in Cricket and Sports enthusiasts.

He participated in Standard Chartered Bank Half Marathon five times.He introduced me to most of BOI staff I used to visit Shivaji Park Dadar every day and meet him and all his friends.

A teetotaler and nonsmoker.

Loved watching Cricket Football Tennis and Olympics and used to remain awake to watch Games at late night too.

A soft spoken man a darling man amongst his friends.

He will surely be missed by his family and his close friend circle.

Good Bye my Dear Brother I will surely miss you but I will remember you forvever with your fond memories.

- **Pravin Ajinkya**




you're Invited

Maheshwari Bungalow

**Exceptional Multi-Level Family Home With 4 BED ROOMS**

**Facilities Available :**

- 24 hours Caretaker
- Spacious Living Room with Ample Seating
- Comfortable Bedrooms with attach washrooms
- Television for Entertainment purpose
- Wifi Facility
- Kitchen is provided with all Cooking Appliances , Refrigerator & Water Purifier
- Open Varanda & Terrace for sitout to enjoy plesant climate & fresh air
- Car Parking space available

PRICE ON REQUEST ONLY

**Please Join Us for a stay at our House**

Call / whatsapp - +91 9933777804 / 9869072111

Landline no – 022 22033550

Address : Plot No 4, Survey no 30 next to kaveri farm near kara society

Behind Swami Bhavan ( Temple) Nangargaon Lonavala – 410401.

( Only for family – 8 persons & Max. 10 persons with extra charge. )

We have registered with Maharashtra Tourism Development Corporation ( MTDC ) .



## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ In the memory of Rasik Krishnarao Vijaykar from his sisters, brothers, nephews and nieces Rs. 3000/-.

## अभिनंदन

✶ डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी निर्मित 'मराठीच्या व्यापक हितासाठी' या समितीत मृदुला प्रभुराम जोशी यांचा समावेश आहे.

✶ एशियाटिक सोसायटीतर्फे 'यावत्चंद्र दिवाकरौ' हा पाडव्यावर आधारित ऑनलाईन कार्यक्रम झाला. पारंपारिक पाडवा उत्सव दाखवताना पाठारे प्रभुंचा पाडवा समारंभ दाखवला गेला. सॉलि. राजन जयकर आणि सौ. केतकी जयकर यांचा त्यात सहभाग होता.

✶ डॉ. सौ. अनिता राणे कोठारे अजंठा लेण्यांविषयी प्रकल्प सादर करण्यासाठी भारतीय पुरातन विभागातर्फे अमेरिकेस जाऊन आल्या.

✶ सौ. मनिषा जितांशु कोठारे यांना त्यांच्या पाककृतीबद्दल रेनाइसान्स पॉवर मॅरियट हॉटेलतर्फे पारितोषिक प्राप्त झाले.

✶ सौ. गीता श्री. आंबवणे यांच्या पंच्याहत्तरीनिमित्त त्यांचा 'रत्न' हा कवितासंग्रह त्यांच्या एका लेखासहित प्रकाशित झाला. पंच्याहत्तरीनिमित्त शुभेच्छा.

✶ श्री. नितांत त्रिलोकेकर यांचे हैद्राबाद येथील 'रामोजी सिटी' मधील हॉटेलमध्ये, 'रेसिडेन्सियल रिजनल कॉन्फरन्स'मध्ये भाषण झाले.

✶ डॉ. अंबरिश प्रफुल्ल विजयकर यांना 'नेशनवाईड अंडर फिफ्टी' या क्रमवारीत होमियोपथी वर्गीकरणात 'बिझिनेस लीडर' हे पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.

✶ डॉ. निखिल विनोद धुरंधर यांा टेक्सास टेक युनिव्हर्सिटीतर्फे 'प्रोफेसिंग एक्सलन्स अवॉर्ड' लाभले.

✶ The University of Michigan confers the Distinguished Leadership Award upon "undergraduate and graduate students of the College of Engineering who have demonstrated outstanding leadership and service to the College." Atharva Talpade, University of Michigan B.S. Computer Science and Philosophy Class of 2021, was recently awarded this honor.

Atharva's impact on campus started with leading his small-business-focused startup Sizzl in his first year. Post Sizzl, he furthered UMich's entrepreneurial scene as a Venture Partner at Contrary Capital, ensuring that venture funding and the spotlight reached the most talented UMich startups. In his second year, he represented Michigan at DARPA's machine learning competition. He competed against grad students and researchers at colleges including Caltech, MIT, Stanford, etc... and created the most accurate thyroid cancer predictor. In his third year, he founded UMich's first product management initiative, MProduct. It has over 250 members, with many members joining leading tech companies or starting their own startups. After graduation, Atharva will take all the leadership and entrepreneurial traits he learned through university and enter the tech industry.

⁎

## प्रभुतरुणाची डायरी

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०३-०४-२१ | सौ. स्नेहलता सनतकुमार राणे, | वय ६१, | मीरा रोड |
| ०९-०४-२१ | श्री. रसिक कृष्णराव विजयकर, | वय ७६, | बोरिवली |
| १३-०४-२१ | श्री. ज्योतींद्र दत्ताराम अजिंक्य, | वय ८०, | तळेगाव |
| १४-०४-२१ | श्री. मधुचंद्र श्रीपाद तळपदे, | वय ८४ | विलेपार्ले |
| १९-०४-२१ | श्री. रसिक शिवशंकर तळपदे, | वय ८५ | विलेपार्ले |
| २१-०४-२१ | श्री. प्रदीप बालमुकुंद रणजीत, | वय ७८ | मीरा रोड |
| २२-०४-२१ | श्री. सुबोध नागेश जयकर, | वय ८८ | गोरेगाव |
| २६-०४-२१ | श्री. प्रभाकर मोरेश्वर कीर्तिकर | वय ८८ | इंदूर |
| २७-०४-२१ | श्री. आनंद शामराव तळपदे | वय ७० | गोरेगाव |
| २८-०४-२१ | श्री. सुरेश रामराव विजयकर | वय ९२ | हैद्राबाद |

*चुकीची दुरुस्ती:*- श्री. नीतिन वसंतराव देसाई यांची तारीख ०८-०३-२१ वाचावी.

## प्रतिक्रिया

✶ एप्रिल महिन्यातील प्रभुतरुणाचे संपादकीय आगळेवेगळे, छान आहे. आवडले.

**-सौ. अचला सुभाष देसाई**

✶ तुमचे कवितारुपी 'एप्रिल फूल' भावले. कल्पना आवडली. मयुराचे विस्तारित संपादकीयही आवडले. नीलिमा जयकर यांनी सुंदर लेख लिहिला आहे. इतर लेखनही चांगले झाले आहे.

**-वृंदा जयकर**

✶ 'विठोबा कान्होजी कोठारे राममंदिर' रामवाडी (जेथे क्रांतिवीर चाफेकर यांचे स्मारक आहे.) येथील रामनवमी सोहळा सध्याच्या वातावरणामुळे ऑनलाईन साजरा झाला. श्री. अरविंद धुरंधर यांनी तो दर्शनोत्सुक भक्तांसाठी सादर केला.

## परीक्षेतील सुयश

**एम्.एस्.सी. (कॉम्प्युटर ॲप्लिकेशन)**

कु. श्रुती रवींद्र देसाई (GP-Ay, 16/1-)

(Cont. from page 3 col 2)

Suvrata Samant, who is also a member of the Managing Committee of the Snehankit Helpline, has been associated with Paritai, much before the start of the Helpline. Sharing her experience of Paritai since she has known her very closely for many years.

"I have been very lucky to be in association with Parimala whom I called affectionately Pari, since 1974. That year, while I was in inter, she joined the Ram Narayan Ruia College as a FY Arts student. I have been her reader during our college days and even later on for a while till she finished her post-graduation. Over the years we had developed a wonderful bond which was not only between the two of us but also between our two families.

Pari was blessed with wonderful parents who took utmost care of her in all respects but at the same time made her self sufficient to run her day-to-day activities on her own.

During her education Pari realized the difficulties a visually impaired student faced in college. They had to submit their assignments like the sighted students but lacked all the basic access to information. This led her to start a helpline for the visually impaired students.

Since its inception Snehankit Helpline has been dedicated to helping the visually impaired students in their educational pursuits. And all this is done by a hoard of dedicated volunteers who work selflessly to keep alive the vision and mission of Snehankit Helpline as envisaged by Parimala.

Parimala is visually impaired but I have never come across her as someone frustrated and stressed out because of her physical condition. She is ever smiling, a cool person with sugar on her tongue and ice on her head. This unique quality has made her a very popular leader of Snehankit Helpline. Everyone looks up to her for inspiration and guidance. I feel blessed to be her friend for over 47 years. I am delighted to be part of her dream, Snehankit Helpline, since its inception and looking forward to contributing to its further growth in whatever capacity I can."

Indeed Paritai's charming personality and her able leadership are her greatest assets that have taken Snehankit to where it is today.

If anyone wishes to be a part of the Snehankit family by contributing in any way, you can:

Call: 9920680359
Email: snehankithelpline@gmail.com
For more details visit:
www.snehankithelpline.org

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67